**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शुक्रवार दिनांक २८ ऑगस्ट २०२६**

**ठळक बातम्या....**

**1. देशभरात राखीपौर्णिमेचा उत्साह, भेटवस्तू, मिठाई खरेदीसाठी लगबग**

**2. अतिवृष्टीग्रस्त राज्यातील शेतकऱ्यांसाठी २३ कोटी ३३ लाखांची मदत; बुलढाण्याला सर्वाधिक १० कोटी ७८ लाखांचा निधी**

**3. नागपूरच्या कल्याणेश्वर मंदिर विकास आराखड्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखालील शिखर समितीची मंजुरी**

**4. ग्रँड चेस टूर स्पर्धा जिंकणारा आर. प्रज्ञानंद ठरला पहिला भारतीय**

**आता सविस्तर बातम्या ......**

राखी पौर्णिमेचा सण

देशभरात राखी पौर्णिमेचा सण पारंपरिक पद्धतीनं साजरा केला जात आहे. या दिवशी बहीण भावाला राखी बांधते आणि तिचं रक्षण करण्याचं आश्वसन देतो अशी प्रथा आहे. विविध प्रकारच्या पदार्थांनी बनवलेल्या सुंदर आकर्षक राख्या बाजारात उपलब्ध आहेत. तसंच मिठाईच्या दुकानांमधे गर्दी आहे. रक्षाबंधनाचं औचित्य साधून स्नेहबंध वाढवणारे विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी देशवासियांना राखीपौर्णिमेच्या शुभेच्छा दिल्या आहेत. समाज आणि राष्ट्राचे रक्षण करत विकसित भारत घडवण्याचे आवाहन त्यांनी आपल्या संदेशातून केलं आहे. आपलेपणाचे बंध दृढ करणारा राखीपौर्णिमेचा सण सुसंवाद आणि परस्परांचा आदर या मूल्यांची जाणीव करुन देतो. सर्वांना या निमित्ताने सौख्य आणि समृद्धी लाभो अशा शब्दात उपराष्ट्रपती सी.पी.राधाकृष्णन यांनीही राखीपौर्णिमेच्या शुभेच्छा दिल्या आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी, राखीपौर्णिमेचा सण सर्वांच्या जीवनात आनंद, समृद्धी आणि यश घेऊन येवो अशा शुभेच्छा दिल्या आहेत दरम्यान रक्षाबंधनानिमित्त नागपूर महानगरपालिकेने शहरातील महिलांसाठी मोफत बस प्रवासाची सुविधा जाहीर केली आहे. आज 'आपली बस' सेवेच्या पहिल्या फेरीपासून रात्रीच्या शेवटच्या फेरीपर्यंत महिलांना मोफत प्रवास करता येणार आहे.महिलांसोबत प्रवास करणाऱ्या दहा वर्षांखालील मुलांनाही या सुविधेचा लाभ मिळणार आहे. वातानुकूलित आणि विनावातानुकूलित अशा दोन्ही बसमध्ये ही सवलत लागू राहील.

जनधन योजना

जनधन योजनेला अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला असून गेल्या बारा वर्षांच या योजनेने अधिकाधिक नागरीकांना अर्थव्यवस्थेच्या कक्षेत आणून त्यांचं सबलीकरण केलं आहे असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना आपल्या समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. पंतप्रधानांनी 2014 मध्ये याच दिवशी या योजनेचा आरंभ केला होता. आतापर्यंत या योजनेत 59 कोटी खाती उघडली गेली असून त्यातली 78 टक्के खाती ग्रामीण किंवा अर्धशहरी भागात उघडली आहेत तर सुमारे 56 टक्के खाती महिलांची आहेत.

अतिवृष्टी मदत बुलढाणा

राज्यातील विविध भागांत जून आणि जुलै २०२६ या कालावधीत झालेली अतिवृष्टी, पूर परिस्थिती, चक्रीवादळ आणि गारपीटीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना २३ कोटी ३३ लाख ३१ हजार रुपयांचा मदत निधी राज्य सरकारनं मंजूर केला. हा निधी शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर थेट जमा होणार असल्याची माहिती, मदत आणि पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील यांनी काल दिली. राज्यातल्या १७ हजार २४५ शेतकऱ्यांना याचा लाभ होणार आहे. यामध्ये . बुलढाणा जिल्ह्याला सर्वाधिक १० कोटी ७८ लाख ५७ हजार रुपये मंजूर झाले असून, बुलडाणा जिल्ह्यातील ७ हजार ६५८ शेतकऱ्यांच्या ५ हजार ४८९ हेक्टर क्षेत्रावरील नुकसानीसाठी ही मदत मिळणार आहे. दरम्यान अमरावती विभागातील 4 जिल्ह्यांसाठी एकूण १३ कोटी ८० लाख ७४ हजार रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. मदत डीबीटीद्वारे थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा केली जाणार असून, जुन्या कर्जाच्या वसुलीसाठी ही रक्कम वळती करता येणार नाही.एका नुकसानीसाठी दुबार मदत मिळणार नाही, याची दक्षता घेण्याच्या सूचना प्रशासनाला देण्यात आल्या आहेत.

पेपरफुट

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या औषध निरीक्षक पदाच्या पेपरफुटी प्रकरणी मुख्य आरोपी आणि कौटिल्य अकॅडमीचा संचालक प्रवीण पाटील याला आज सकाळी मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेच्या पथकानं नंदुरबारात आणलं. त्यानंतर त्याच्या अकादमीत त्याची सुमारे तासभर चौकशी झाली. पाटीलची ई-साक्ष तसंच ओळख परेड झाली. तपासाच्या पुढच्या टप्प्यात घरी तसंच मूळ गावी जाऊन झडती घेतली जाईल, असं सूत्रांनी सांगितलं.

## सोने

आज  सराफा बाजारात २४ कॅरेट सोन्याच्या दरात  1 पूर्णांक  9  टक्क्यांनी घसरण होऊन ते  1 लाख  58 हजार  386 रुपये प्रति दहा ग्रॅम झाले. तर, चांदीच्या दरातही  1 पूर्णांक  9  टक्क्यांनी घट होऊन ती  2  लाख  39  हजार  500 रुपये प्रति किलोग्रॅम झाली.

## साखर साठ्यावर निर्बंध

अकोला जिल्ह्यात साखरेची साठेबाजी आणि दरवाढ रोखण्यासाठी जीवनावश्यक वस्तू अधिनियमाअंतर्गत साखर साठ्यावर निर्बंध लागू करण्यात आले आहेत. जिल्ह्यात ३० नोव्हेंबरपर्यंत हे निर्बंध लागू राहणार आहेत.त्यानुसार साखर विक्रेते, वितरक आणि व्यावसायिकांना जास्तीत जास्त  4 हजार क्विंटल साखरेचा साठा ठेवता येणार आहे. मोठ्या ग्राहकांनाही महिन्याला  10 मेट्रिक टनांपेक्षा अधिक साखर वापरत असल्यास 15 दिवसांपेक्षा जास्त साठा ठेवता येणार नाही.निर्बंधांच्या अंमलबजावणीसाठी अकोल्यात 9 तपासणी पथके गठित करण्यात आली असून तपासणी सुरू आहे. नागरिकांनी गरजेनुसारच साखर खरेदी करावी आणि अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

## नेत्रदान

२०२५-२६ या कालावधीत नेत्रदान करून अनेकांचे जीवन प्रकाशमान करणाऱ्या २०० नेत्रदात्यांच्या परिवाराचा सन्मान सोहळा ३० ऑगस्ट रविवारी सकाळी १० वाजता इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स सभागृहात होणार आहे. राष्ट्रीय नेत्रदान पंधरवड्यानिमित्त रौशनी फाउंडेशनतर्फे विविध नेत्रपेढ्यांच्या सहकार्याने आयोजित या कार्यक्रमाला झेडटीसीसी नागपूरचे अध्यक्ष डॉ. मनीष श्रीगीरीवार प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. एनएसएसएलचे व्यवस्थापकीय संचालक आनंद जयस्वाल यांची विशेष उपस्थिती असेल.

## मंदीर विकास आराखडा

नागपूरच्या  महाल स्थित ऐतिहासिक कल्याणेश्वर मंदिर परिसराच्या सुधारित विकास आराखड्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या शिखर समितीच्या बैठकीत काल मंजुरी देण्यात आली. या प्रकल्पासाठी  72 कोटी 49  लाख रुपयांच्या खर्चास मान्यता देण्यात आली आहे.मंदिर परिसराचे हेमाडपंथी स्थापत्यशैलीनुसार सुशोभीकरण, भव्य सभामंडप, बहुउद्देशी

सभागृह, वेदशाळा, योगशाळा, महाप्रसाद  सुविधा, प्रसाधनगृहे  आणि  पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे. भाविकांच्या सोयीसाठी पार्किंगची व्यवस्था वाढवावी, असे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले. यांत्रिक वाहनतळाऐवजी साध्या पार्किंगची व्यवस्था करण्याची सूचनाही त्यांनी केली. दरम्यान, हिंगोली जिल्ह्यातील औंढा नागनाथ मंदिराच्या १९३ कोटी ५५ लाख रुपयांच्या सुधारित विकास आराखड्यालाही बैठकीत मंजुरी देण्यात आली.  तसेच पुण्याजवळ आंबेगाव येथील शिवसृष्टी थीम पार्कच्या चौथ्या टप्प्याच्या कामासाठी ५० कोटींचा निधी मंजूर करण्यात आला

नेपाळ  नागरिक  माहिती

नेपाळमध्ये निर्माण झालेल्या पूरस्थितीच्या पार्श्वभूमीवर अमरावती आणि नागपूर जिल्ह्यातील नेपाळला गेलेले नागरिक सुरक्षित असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे.नागपूर जिल्ह्यातील श्री स्वामी महाराज यांच्या समूहासोबत काठमांडूला गेलेले ११० नागरिकही सुरक्षित आहेत. प्रामुख्याने ज्येष्ठ नागरिकांचा समावेश असलेला हा समूह काठमांडूतील माहेश्वरी समाज येथे वास्तव्यास होता. नेपाळ प्रशासनाच्या सहकार्याने पर्यायी बसची व्यवस्था करून हे नागरिक काल जनकपूरमार्गे नेपाळ-भारत सीमेच्या दिशेने रवाना झाले आहेत. आज पटना येथून रेल्वेने त्यांना नागपूरला आणण्याचे नियोजन आहे.अमरावतीचे श्याम मारोडकर आणि त्यांचे  3 मित्र नेपाळमध्ये पर्यटनासाठी गेले होते. दोन दिवस संपर्क न झाल्याने कुटुंबीय चिंतेत होते. मात्र, आता त्यांच्याशी संपर्क झाला असून ते परतीच्या प्रवासाला लागले आहेत. दरम्यान, नेपाळमधील परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाचा नियंत्रण कक्ष चोवीस तास कार्यरत आहे. मदतीसाठी नागरिकांनी १०७० या टोल फ्री क्रमांकावर  संपर्क साधावा,  असे आवाहन करण्यात आले आहे.

स्ट्रक्चरल ऑडिट

गडचिरोली जिल्ह्यातल्या सर्व पुलांचे स्ट्रक्चरल ऑडिट करून आवश्यक दुरुस्ती आणि पुनर्बांधणीची कामं प्राधान्यानं करण्याचे निर्देश सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी काल दिले. जिल्ह्यातील रस्ते आणि पुलांच्या विकासकामांचा आढावा सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांनी घेतला, त्यावेळी ते बोलत होते.  दरम्यान आज ते भंडारा जिल्ह्याच्या दौऱ्यावर होते .त्यांनी आज घेतलेला बैठकीत  आरोग्य विभागाशी संबंधित बांधकामांचा आढावा घेण्यात आला. भंडारा येथील १०० खाटांच्या स्त्री रुग्णालयाच्या दुसऱ्या टप्प्याचे २५.२५ कोटी रुपयांचे काम ७० टक्के पूर्ण झाले आहे. तसेच साकोली

उपजिल्हा रुग्णालयाची क्षमता ५० वरून १०० खाटांपर्यंत वाढविण्याचे ६१.२३ कोटी रुपयांचे काम ८० टक्के पूर्ण झाले आहे.

विजय वडेट्टीवार

उद्योगांच्या घोषणा करून सरकार गडचिरोलीच्या विकासाच्या नावाखाली जनतेची दिशाभूल करत असून, नैसर्गिक संपत्ती लुटण्याचा डाव असल्याचा आरोप काँग्रेस विधिमंडळ पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी गडचिरोली इथं केला. जिल्ह्यात आरोग्य, शिक्षण, रस्ते, सिंचन आणि रोजगाराच्या मूलभूत सुविधांची दुरवस्था असताना उद्योगांच्या घोषणा कशासाठी, असा सवाल त्यांनी केला. आदिवासी आश्रमशाळांमध्ये सर्पदंशाने दोन वर्षांत २८ विद्यार्थ्यांचा मृत्यू झाल्याचा दावा करत, मंजूर निधीपैकी केवळ २९ टक्के निधी खर्च झाल्याचा आरोपही त्यांनी केला. “गडचिरोलीच्या विकासाला विरोध नाही; मात्र स्थानिकांच्या हक्कांवर गदा आणून नैसर्गिक संपत्तीची लूट सहन केली जाणार नाही,” असा इशारा वडेट्टीवार यांनी पत्रकार परिषदेत दिला.

आर. प्रज्ञानंद

ग्रँड चेस टूर स्पर्धा जिंकणारा ग्रँडमास्टर आर. प्रज्ञानंद हा पहिला भारतीय खेळाडू ठरला आहे. अमेरिकेतल्या सेंट लुईसमध्ये झालेल्या स्पर्धेत त्यानं अमेरिकेच्या फाबियानो कॅरुआना याला पराभूत करुन हा किताब मिळवला. अंतिम फेरीत सुरुवातीला पिछाडीवर असलेल्या प्रज्ञानंद यानं काल जोरदार पुनरागमन केलं आणि १५-१३ अशी ही स्पर्धा जिंकून २ लाख डॉलरचं इनाम पटकावलं.

आशिया करंडक क्रिकेट स्पर्धा

महिलांची 20 षटकांची आशिया करंडक क्रिकेट स्पर्धा आजपासून दुबईत सुरु होत आहे. भारत, पाकिस्तान, थायलंड हाँगकाँग यांचा गट अ मध्ये समावेश आहे. आठ संघांचा समावेश असलेल्या स्पर्धेतील साखळी सामने येत्या 8 सप्टेंबर पर्यंत होणार आहेत. ही स्पर्धा आगामी आंतरराष्ट्रीय टी-20 सामन्यांसाठी महत्त्वाची मानली जात आहे.

हवामान

आगामी एका तासात पूर्व विदर्भातील सर्वच जिल्ह्यांमध्ये हलक्या पावसाची शक्यता नागपूरच्या प्रादेशिक हवामान केंद्राने वर्तवली आहे